यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी
(महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था)
Yashwantrao Chavan Academy of Development Administration
(A Government of Maharashtra Organisation)

सत्यमेव जयते

ISO 9001 : 2008

क्र प्रशा-१/१०२२/नेमणूक-प्रतिनियुक्ती
दिनांक :- ११.०७.२०२२

प्रति
कार्यासन अधिकारी, (कार्यासन १२-अ)
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

विषय :- प्रतिनियुक्तीने नियुक्तीची जाहिरात शासन संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, यशदा संस्थेमध्ये प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात् ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. सविस्तर जाहिरातीची प्रत यासोबत जोडण्यात आली आहे.

०२ आपणास विनंती करण्यात येते की सदरची जाहिरात कृपया शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती जाहिरात प्रसिध्द करण्यासाठीचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

विभागाचे नाव :- यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) (सामान्य प्रशासन विभाग)
जाहिरातीचे शिर्षक :- यशदा येथे प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज
Application for deputation at YASHADA through online.
जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक :- ११.०७.२०२२
अर्ज करण्याची शेवटची मुदत ०१ ऑगस्ट २०२२ (कार्यालयीन वेळेपर्यंत – सायंकाळी ५.४५ पर्यंत)
(https://www.yashada.org/deprecyashada.php)

आपला विश्वासू

(निबंधक)
यशदा, पुणे

(मा. महासंचालक यांच्या मान्यतेने)

# यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी

## राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे – ४११ ००७

www.yashada.org/admin@yashada.org

---

# प्रतिनियुक्तीने नियुक्ती

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) येथे खालील पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | वेतनस्तर | अर्हता / पात्रता / अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | २ | S-२९ | **अर्हता** :- मान्यताप्राप्त विद्यापीठातील / प्रशिक्षण संस्थेतील समकक्ष पदावरील अधिकारी. **अनुभव** :- मान्यताप्राप्त विद्यापीठातील अथवा नामांकित प्रशिक्षण संस्थेतील संशोधन व प्रशिक्षण क्षेत्रातील किमान १० वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. **किंवा** अखिल भारतीय सेवेतील किमान १० वर्ष अनुभव असलेला सुयोग्य अधिकारी. **किंवा** राज्य शासनाच्या सेवेतील समकक्ष वेतनस्तर असलेला अधिकारी. |
| २ | विभागप्रमुख स्थावर, कार्यकारी अभियंता आणि सहयोगी प्राध्यापक | १ | S-२५ | सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता या पदावर किमान ५ वर्षाचा अनुभव असणारे अधिकारी. |
| ३ | सहयोगी प्राध्यापक | ४ | S-२५ | **अर्हता** :- मान्यताप्राप्त विद्यापीठातील / प्रशिक्षण संस्थेतील समकक्ष पदावर कार्यरत अधिकारी. **अनुभव** :- मान्यताप्राप्त विद्यापीठातील अथवा नामांकित प्रशिक्षण संस्थेतील संशोधन व प्रशिक्षण क्षेत्रातील किमान ७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. **किंवा** राज्य शासनाच्या सेवेतील समकक्ष वेतनस्तर असलेला अधिकारी (राज्य शासनाच्या सेवेत किमान ७ वर्षे सेवा) |
| ४. | सहायक प्राध्यापक | ३ | S-२० | राज्य / केंद्र शासनाच्या सेवेतील समकक्ष वेतनस्तर असलेला सुयोग्य अधिकारी (राज्य शासनाच्या सेवेत किमान ७ वर्षे सेवा) **किंवा** अर्हता :- मान्यताप्राप्त विद्यापीठातील / प्रशिक्षण संस्थेतील सुयोग्य विद्याशाखेतील सदस्य. अनुभव :- मान्यताप्राप्त विद्यापीठातील अथवा नामांकित प्रशिक्षण संस्थेतील संशोधन व प्रशिक्षण क्षेत्रातील किमान ७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |
| ५. | स्थावर व्यवस्थापक | १ | S-२० | राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील उपअभियंता या संवर्गातील अधिकारी. (राज्य शासनाच्या सेवेत किमान ७ वर्षे सेवा) |

(कृ मा प)

०२ वरील पदांवरील नियुक्तीसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचे आहेत. त्यासाठी https://www.yashada.org/deprecyashada.php या संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध आहे. अर्ज सादर करण्याची अंतीम मुदत दिनांक :- ०१/०८/२०२२ कार्यालयीन वेळेपर्यंत (५.४५ पर्यंत) राहील.

०३ अर्ज करण्यासाठी तांत्रिक अडचण उद्भवल्यास कृपया ०२०-२५६०८२१९ या क्रमांकावर संपर्क करावा.

ठिकाण :- पुणे
दिनांक :- ११.०७.२०२२

सही/-
निबंधक, यशदा